# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☎ ९६९६२३४ फॅक्स ९६९६२३४ Email : ropune.dte@gmail.com


जा. क्र. : तंशिविकापु/आस्था/परवानगी/२०१७/05 दिनांक: 01 JAN 2018

प्रति,

प्राचार्य,
या कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित
पदवी व पदविका संस्था.

**विषय : या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना भेटण्यासाठी परवानगीबाबत...**

उपरोक्त विषयासंदर्भात असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याचशा संस्थांमधील / कार्यालयांमधील कर्मचारी संबंधित संस्था प्रमुखांची पूर्वपरवानगी न घेता परस्पर या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना भेटतात. अशा अचानक भेटीमुळे संबंधित अधिकारी / कर्मचा-यांच्या कामकाजाचा खोळंबा होतो. व नाहक वेळ वाया जातो.

तरी याबाबत आपणांस कळविण्यांत येते की, यापुढे आपल्या संस्थेतील ज्या कर्मचा-यांना त्यांच्या शासकीय कामकाजाविषयी या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी .यांना कार्यालयीन वेळेत भेटावयाचे आहे, अशा कर्मचा-यांना आपल्या स्वाक्षरीचे परवानगी पत्र असल्याशिवाय त्यांना या कार्यालयात पाठवू नये. अशी संबंधित संस्था प्रमुखांची पूर्व परवानगी पत्र नसलेले जे कर्मचारी या कार्यालयात येतील अशा कर्मचा-यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल याची त्यांनी नोंद घेण्याबाबत त्यांना सूचित करावे.

(डॉ. दि. रा. नंदनवार),
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.